पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक १**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. ३/४/२०१८** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **महात्मा जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**घनकचरा व्यवस्थापन आढावा**

**विषय क्र. १**

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाविषयी पंधरा क्षेत्रिय कार्यालयाकडील दि.१/३/२०१८ ते दि.२१/३/२०१८ अखेर पर्यंत पाठविलेला अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.सह.महा.आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) यांचे जा.क्र.घकव्यका/५१०७ दि. २३/३/२०१८ चे पत्र.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. २**

मा.सौ.चाँदबी नदाफ, मा.बाळा ओसवाल, मा.सौ.नंदा लोणकर, मा.सौ.हमीदा सुंडके, मा.साईनाथ बाबर व मा. सौ.सुनिता वाडेकर यांचे दि. २६/३/२०१८ चे पत्र.

पुणे महापालिका सन २०१७-२०१८ चा अर्थसंकल्प हा पुणे महानरगपालिका सार्वत्रिक निवडणूकीमुळे दोन महिने उशीरा मान्य झाला. तद्नंतर अर्थसंकल्पाप्रमाणे कामे होण्यास सुरूवात होत असताना माहे जूलै अखेरीस जी.एस.टी. करप्रणाली आल्याने सर्व विकासकामांच्या निविदा रद्द करण्यात आल्या. त्यानंतर जी.एस.टी. मुळे पुन्हा डी.एस.आर. मध्ये बदल करून नव्याने निविदा मागविण्यात आल्या. तसेच दक्षता विभागाने काढलेल्या विविध त्रुटींमुळे वर्क ऑर्डर मिळण्यास विलंब झाला आहे.

सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात विकासकामे होताना अनेक अडथळे आल्याने नागरिक विकासकामांपासून वंचित राहत आहेत. सदरची सर्व विकास कामे करणेसाठी सन २०१७-२०१८ अर्थसंकल्पातील विकासकामांना मुदतवाढ देणे अत्यावश्यक आहे.

तरी सन २०१७-२०१८ मधील विकासकामांना किमान २ महिन्याची मुदतवाढ देण्यात यावी.

**विषय क्र. ३**

मा.बाळा ओसवाल यांचे दि. २८/३/२०१८ चे पत्र.

पुणे मनपा हद्दीतील कात्रज कोंढवा रोड परिसरात गेल्या १० वर्षात लोकसंख्येच्या प्रमाणात जवळपास ४ पटीने वाढ झाली आहे. वाढत्या नागरिकरणामुळे हा परिसर प्रचंड लोकसंख्येचा झाल्यामुळे दिवसेंदिवस रस्ते वाहतूकीकरिता अपुरे पडत असून, नागरिकांना वारंवार अपघातांना सामोरे जावे लागत आहे. या रस्त्यानजीक अनेक मोठे कॉलेजेस, धार्मिक स्थळे आहेत. या रस्त्याचा राष्ट्रीय महामार्ग समकक्ष रस्ता म्हणून वापर होत आहे. या परिसरातील नागरिक वाहतूक कोंडीने त्रस्त झाले असून, बहुमुल्य वेळ तासनतास रखडलेल्या वाहतूक कोंडीत वाया जात आहे. कात्रज कोंढवा रस्त्याचे रूंदीकरण ही बाब परिसरातील नागरिकांची आर्थिक व जीवीत हानी टाळण्यासाठी आवश्यक झालेली आहे. गेल्या अनेक वर्षापासून कात्रज कोंढवा रस्त्याचे काम विचित्र घटनांमुळे रखडलेले असून, राज्याच्या मुख्यमंत्र्यांना या रस्त्याच्या टेंडर प्रक्रियेत हस्तक्षेप करावा लागलेला आहे.

पुणे मनपाच्या वतीने राष्ट्रीयकृत बॅकेंमध्ये मुदत ठेवी ठेवण्यासाठी स्थायी समितीपुढे प्रस्ताव आणले जात आहेत. शेकडो कोटीच्या ठेवी दिर्घ मुदतीने बॅंकेत ठेवण्याचे प्रयोजन सुरू आहे. नागरिकांचे पैसे बॅकेत ठेवून व्याज कमविण्यापेक्षा मनपाने सर्वोच्च प्राधान्याने या ठेवींमधील र.रू.१०० कोटी एवढी रक्कम तातडीने कात्रज कोंढवा रस्ता रूंदीकरणांच्या विकास कामांसाठी वापरावी.

## हिशोब तपासणी अहवाल

**विषय क्र. ४**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(३) अन्वये मुख्य लेखापरिक्षक कार्यालयाचा कारभारविषयक आणि हिशोब तपासणीबाबतचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/१३४३ दि.२२/३/२०१८ ने पाठविलेला सन २०१५–२०१६ चा वार्षिक वृत्तांत विचारासाठी.

**विषय क्र. ५**

कर आकारणी व कर संकलन खात्याकडील लोहगाव अे फॉर्म क्र. १५ सन २०११–१२ मधील आकारणी प्रकरणांची व तदनुषंगिक कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/१४३२ दि. २८/३/२०१८ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. ३७ सन २०१७–२०१८ चा विचारासाठी.

**विषय क्र. ६**

कर आकारणी व कर संकलन खात्याकडील विविध पेठांचे सन २०१५–१६ व सन २०१६–१७ मधील आकारणी प्रकरणांची व तदनुषंगिक कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/१४३३ दि. २८/३/२०१८ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. ३९ सन २०१७–२०१८ चा विचारासाठी.

**विषय क्र. ७**

कर आकारणी व कर संकलन खात्याकडील पेठ खराडी (भाग–३) सन २०१६–२०१७ मधील आकारणी प्रकरणांची व तदनुषंगिक कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/१४३४ दि. २८/३/२०१८ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. ४० सन २०१७–२०१८ चा विचारासाठी.

**विषय क्र. ८**

कर आकारणी व कर संकलन खात्याकडील पेठ खराडी (भाग–१) सन २०१६–२०१७ मधील आकारणी प्रकरणांची व तदनुषंगिक कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/१४३५ दि. २८/३/२०१८ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. ३८ सन २०१७–२०१८ चा विचारासाठी.

## सेवकवर्गाची प्रकरणे

**विषय क्र. ९**

पुणे महानगरपालिकेचे सुरक्षा अधिकारी (वर्ग–२) श्री.संतोष संभाजीराव पवार (प्रभारी मुख्य सुरक्षा अधिकारी) यांच्या निलंबन कालावधीची दि.४/६/२०१७ पासून दि.३/१२/२०१७ पर्यंतची पहिली सहामाही पूर्ण झाली असून मनपा सेवाविनियम मधील प्रकरण ६ वे.क्र. ५८ अनुसार सदर बाब निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/साप्र/३०२ दि. २२/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. १०**

पुणे महानगरपालिकेच्या शहर अभियंता कार्यालयाकडील श्री.किशोर पांडुरंग पडाळ, हुद्दा – उप अभियंता यांच्या निलंबनास दि. ६/१/२०१८ रोजी पहिली सहामाही पूर्ण झाली असून मनपा सेवाविनियम क्र. ५८ नुसार सदर बाब निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/साप्र/१३३१ दि. २७/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. ११**

नगरसचिव कार्यालयाकडील सेवक श्री.रविंद्र निवृत्ती नितनवरे, हुद्दा सुपरवायझर यांनी परदेशात जाण्यासाठी दि.२/५/२०१८ ते दि.३०/६/२०१८ अखेर ६० दिवस हक्काच्या रजेची मागणी केली आहे. त्यांच्या खाती पुरेशी रजा शिल्लक असल्याने मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५७(३) अन्वये मान्यता मिळणेबाबत मा.नगरसचिव यांचे जा.क्र.९५५६ दि. २८/३/२०१८ चे पत्र.

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. १२**

पुणे महानगर परिवहन महामंडळाचे सन २०१६–१७ या आर्थिक वर्षातील संचलन तूटबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/११३८ दि.२३/२/२०१८ ने पाठविलेला लेखापरिक्षण अहवाल विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पंधरा दिवसांनी करावा असे दि.१५/३/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १३**

२४ बाय ७ समान पाणीपुरवठा योजने अंतर्गत यापूर्वी मनपाकडून २८१८ कोटींची काढण्यात आलेली निविदेच्या एस्टिमेटमध्ये तब्बल र.रू.२९० कोटी रूपयांची वाढ करणा–या या निविदेसाठी नेमण्यात आलेल्या सल्लागारास काळया यादीत टाकण्यात यावे व प्रकल्प सल्लागाराविरूध्द कडक कारवाई करण्याबाबत मा.अविनाश बागवे, मा.प्रिया गदादे, मा.रविंद्र धंगेकर, मा.ॲड्.भैय्यासाहेब जाधव व मा.साईनाथ बाबर यांचे दि.१५/११/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १३२१ दि. २१/११/२०१७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त (वि) यांनी जा.क्र. मआ/पापु/८३४ दि. १६/१/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.१५/३/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १४**

पुणे शहरातील सर्व गोठेधारकांना मुंढवा केशवनगर येथे स्थलांतरीत होण्याकरीता दि.३१ डिसेंबर २०१८ पर्यंत मुदत देणे आवश्यक आहे व दरम्यानच्या कालावधीमध्ये गोठेधारकांना प्लॉट देणेसाठी खाली नमुद केलेल्या अटी व शर्ती अथवा धोरणास मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/९२१ दि.३०/१/२०१८ चे पत्र.

१.गोठेधारकांकडून खाली नमुद केलेल्या कागदपत्रांची पूर्तता करणा–या गोठेधारकास क्षेत्रिय कार्यालयाकडील सन २०१५ च्या सर्व्हे नुसार जनावरांच्या संख्येप्रमाणे (१० मोठया जनावरास एक प्लॉट अंदाजे २५०० स्वे.फुट) या तत्वावर प्लॉट देणेस,

२. सदर प्लॉटचे शासकीय मुल्याकंनानुसार भोगवटा मुल्य स्विकारण्यास.

३. मध्यवर्ती शहरातील गोठयांच्या संख्ये इतके प्लॉट राखून ठेवून उर्वरित प्लॉट उपनगरातील पात्र गोठेधारकांना वाटप करणेस,

४. मध्यवर्ती शहरातील गोठे मुंढवा–केशवनगर येथे स्थलांतरीत होण्याच्या दृष्टीने शहरातील गोठे धारकांना दि.३१/१२/२०१८ ही गोठे स्थलांतरीत करण्याकरिता अंतिम तारीख निश्चित करणेस,

५.गोठे स्थलांतरासाठी खालीलप्रमाणे गोठेधारकांची कागदपत्रे ग्राहय धरण्यास.

अ. मा.आरोग्य अधिकारी पुणे महानगरपालिका यांच्या नावे अर्ज.

ब. रेशनींग कार्ड (शिधापत्रिका) ची प्रत.

क. सदर जागेवर सदयःस्थितीत गोठा असल्याचा दिनांक व वेळेसह फोटो व पुणे महानगरपालिकेकडून गोठ्यावर केलेल्या २०१५ पुर्वीचे कारवाईचे कागदपत्रे उदा.मनपा कोर्टातील खटला,सार्वजनिक ठिकाणी घाण केली यासाठी प्रशासकिय शुल्क भरल्याची पावती इ.

ड. महाराष्ट्र शासनाकडील जिल्हा दुग्ध विकास अधिकारी यांचेकडून परवाना अथवा परवाना घेण्याबाबतचे प्रतिज्ञापत्र.

इ. संबंधीत क्षेत्रिय कार्यालयाकडील आरोग्य निरीक्षक,वरिष्ठ निरीक्षक, प्रमुख आरोग्य निरिक्षक,क्षेत्रिय वैद्यकिय अधिकारी, महा.सहा.आयुक्त व क्षेत्रिय उपायुक्त यांच्या स्पष्ट अभिप्रायासह स्वाक्षरीचे गोठ्यासाठी जागा देणेबाबत शिफारसपत्र.

६. सरकारी जमिनीवर (नदीपात्र,रस्ता,एसआरए स्कीम इ.) असलेल्या गोठेधारकांचे देखील उपरोक्त अटी व शर्तींची पुर्तता केल्यास मुंढवा–केशवनगर येथे गोठयांसाठी पर्यायी जागा दिर्घ मुदतीच्या भाडेपट्टयाने देण्यास.

७. दि.३१/१२/२०१८ पर्यंत मुंढवा केशवनगर येथे स्थलांतरीत न होणा–या गोठे धारकांवर कारवाई करुन तेथील गोठे व्यवसाय बंद करण्यास.

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.१५/३/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १५**

मा.सौ.सुजाता शेट्टी व मा.योगेश समेळ यांचे दि. २/१/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. १६ क जुना कसबा पेठ ते जुना बाजार उड्डाणपूल रुपये २,००,००,०००/- (अक्षरी दोन कोटी फक्त) ची तरतुद आहे. सदर काम होत नसून सदरचे रक्कम खालीलप्रमाणे वर्गीकरण करुन रुपये २,००,००,०००/- (अक्षरी दोन कोटी फक्त) कमी व रुपये २,००,००,०००/- (अक्षरी दोन कोटी फक्त) अधिक प्रभाग क्र. १६(क)/(अ)/(ब)/(ड) मधील भागात विविध विकास कामे करणे

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.१५/३/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १६**

मा.योगेश ससाणे व मा.मारुती (आबा) तुपे यांचे दि. ४/१/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. २३ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.१ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-२०१८ चे अंदाजपत्रक, बजेट कोड क्र. एफई६१अे१११, १.हांडेवाडी (ससाणेनगर)येथे उडडाणपूल बांधणे. | १ कोटी | --- |
| **नवीन सुचविलेली कामे** | | |
| १) प्रभाग क्र.२३ अ मध्ये विविध ठिकाणी विद्युत केबल्स भूमिगत करणे | --- | ५० लाख |
| २) प्रभाग क्र.२३ अ मध्ये विविध ठिकाणी रस्ते विकसित करणे | --- | ५० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.१५/३/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १७**

मा.सौ.वैशाली बनकर व मा.योगेश ससाणे यांचे दि. ४/१/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. २३ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.१ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-२०१८ चे अंदाजपत्रक, सार्वजनिक वाहतुक सुधारणा व विशेष प्रकल्प १/१ विभागामार्फत करावयाची कामे, बजेट कोड क्र. एफई६१अे१११, हांडेवाडी (ससाणेनगर)येथे उडडाणपूल बांधणे. | १ कोटी | --- |
| **नवीन सुचविलेली कामे** | | |
| १)प्रभाग क्र.२३ ब मध्ये कै.रामचंद्र बनकर शैक्षणिक व क्रिडा संकुलामध्ये विविध कामे करणे | --- | ५० लाख |
| २)प्रभाग क्र.२३ ब मध्ये कै.रामचंद्र बनकर क्रिडा संकुलामध्ये विद्युतची कामे करणे | --- | ३० लाख |
| ३) प्रभाग क्र.२३ ब मध्ये विविध ठिकाणी विद्युत तारांचे धोकादायक पोल हटविणे | --- | १० लाख |
| ४) प्रभाग क्र.२३ ब मध्ये जेट मशिनने ड्रेनेज लाईन साफ करणे | --- | १० लाख |

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.१५/३/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १८**

अंशदायी वैद्यकिय सहाय्य योजनेअंतर्गत सभासदत्व घेतलेल्या वर्ग १ ते ४ संवर्गातील सर्व पदांवरील म.न.पा. सेवकांचे वेतनामधून मासिक सी.एच.एस.वर्गणी(मूळ वेतन+ग्रेड पे+महागाई भत्ता) या बेरजेच्या १% ऐवजी ४% नुसार कपात करणेस आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतनामधून मासिक सी.एच.एस. वर्गणी (मूळ निवृत्ती वेतन+महागाई भत्ता) या बेरजेच्या १% ऐवजी ४% नुसार कपात करणेस, व त्यानुसार कार्यवाही करणेस मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/९७४ दि.५/२/२०१८ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.१५/३/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १९**

पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागामार्फत राबविणेत येणाऱ्या योजनांबाबत विधवा महिलांच्या अनुदानात र.रुपये ५,०००/- वाढ करुन र.रुपये १५,०००/- अनुदान देण्यात यावे व उर्वरित रक्कम शहरी गरीब आरोग्य योजनेकडे वर्ग करण्यात यावी तसेच मआ/सविवि/१९९ दि.२१/७/२०१७ चा प्रस्ताव दप्तरी दाखल करणेत यावा याबाबत झालेला पक्षनेते सभा दि. ७/२/२०१८ चा निर्णय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.१५/३/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २०**

पाणी पुरवठा व मलनि:सारण विभागाकडील कामांसाठी नियुक्त तज्ञ सल्लागारांचे पॅनेल रद्द करुन निविदा पध्दतीने सल्लागारांची नियुक्ती करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र.मआ/पापु/११३३ दि.६/३/२०१८ चे पत्र.

१)मा.स्थायी समिती ठराव क्र.९२ दि.२६/४/२०११ अन्वये गठीत करण्यात आलेले तज्ञ सल्लागारांचे पॅनेल आणि दर रद्द करणेस
२) पाणी पुरवठा व मलनि:सारण विभागाकडील यापुढील प्रकल्पांकरीता सल्लागार नियुक्ती करीता केंद्रीय दक्षता आयोगाकडील मार्गदर्शक सुचनांचा अंतर्भाव करुन स्वतंत्रपणे निविदा प्रक्रिया राबविणेस
३) निविदेमध्ये प्राप्त होणाऱ्या न्युनतम दराने कामाचा मुशाहिरा नियुक्त सल्लागारात आदा करण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.१५/३/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र.२१**

पुणे म.न.पा.हद्दीतील रस्त्याचे सेफ्टी ऑडीट करणेबाबत तज्ञ स्लागाराची नेमणूक करणे (बी–२ पध्दत) कामी पुढील प्रत्येकी ५० कि.मी. किंवा त्यापेक्षा अधिक लांबीच्या टप्प्यांसाठी प्रतिवर्षी किमान २०० कि.मी. किंवा अधिक लांबीचे रस्त्यांचे अशा एकूण उर्वरित सुमारे ८०० कि.मी. लांबीच्या रस्त्यांसाठी सेफ्टी ऑडीट करणेचे काम मे.वॉल्टर पी.मोअर इंजि.इंडिया प्रा.लि. यांचेकडून र.रुपये २४,९००/– कि.मी. अधिक आवश्यक कर (वस्तु व सेवा कर नियमाचे कलम २४३ जी चे धोरणानुसार प्युअर सव्हिसेस देणाऱ्या कन्सल्टंट यांना ऋद्ध लागू होत नाही) याप्रमाणे एकुण १००० किमीसाठी र.रुपये २,४९,००,०००/– पर्यंत काम करुन घेणे विषयी तसेच टेंडर अटी शर्ती प्रमाणे दोन वर्ष कालावधीनंतर होणाऱ्या कामास प्रती वर्षी ५% प्रमाणे वाढीव दर देणे विषयी दुरुस्त करारनामा करणेसाठी यापुर्वीचा मा.स्थायी समिती ठराव क्र. २२३३ दि.२७/१२/२०१६ दुरुस्त ठराव करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/११६४ दि.१३/३/२०१८ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.१५/३/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २२**

स्मार्ट सिटी ऑफिससाठी (सिटीझन इन्क्वायरी सेंटर) बाणेर स.नं. २९/१+२ येथे बांधण्यात आलेली नवीन क्षेत्रीय कार्यालयाच्या इमारतीमधील काही भाग उपलब्ध करुन देणेबाबत मा.अमोल बालवडकर, मा.विजय शेवाळे व मा.प्रकाश ढोरे यांचे दि. २/२/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २१०२ दि. १२/२/२०१८ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/माव्य/११७७ दि. १३/३/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.१५/३/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २३**

मा.सौ.हमीदा सुंडके, मा.सौ.परवीन शेख व मा.ॲड्.हाजी गफूर पठाण यांचे दि.१३/३/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. २७ मध्ये सिव्हीक कल्चरल व कम्युनिटी सेंटर बांधणेसाठी र.रू. ५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, बजेट कोड नं.सीई२२अे६८०, पान क्र. १०८, हज हाऊस बांधणे | ५० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र. २७ मध्ये सिव्हीक कल्चरल व कम्युनिटी सेंटर बांधणे | --- | ५० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.१५/३/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २४**

मा.मारुती तुपे व मा.सुनिल कांबळे यांचे दि.१३/३/२०१८ चे पत्र.

अप्पर डेपो ते व्ही.आय.टी.हॉस्टेल (पासलकर चौक) रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.राधालक्ष्मी कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१,२५,९५,०९०/– पेक्षा २१.०४% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.९९,४५,०८३=०६ अधिक ५०% वाढीव रकमेपर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता देण्यात यावी

याबाबत यापुर्वी झालेला स्थायी समिती ठ.क्र. २३१० दि. ३/१/२०१७ निरस्त करण्यात यावा.

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.१५/३/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २५**

मा.दिलिप बराटे व मा.सौ.लक्ष्मी दुधाने यांचे दि.१३/३/२०१८ चे पत्र.

राजमाता जिजाऊ मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल उभारणेसाठी र. रू. २.५० कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात मान्यता देण्यात यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, यादी क्र. एस.जे.६, शहरामध्ये नव्याने प्रसुतीगृह / विविध सोयी सुविधा असलेले दवाखाने उभारणे, पान क्र. २२६,अ.क्र.६२, नविन हॉस्पिटलची उभारणी करने व सावित्रीबाई नर्सिंग कॉलेज एकूण तरतूद र.रू. १० कोटी | २.५० कोटी | --- |
| **<u>नवीन सुचविलेले काम</u>**<br>राजमाता जिजाऊ मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल उभारणे. | --- | २.५० कोटी |

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.१५/३/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २६**

मा.दिलिप बराटे व मा.सौ.लक्ष्मी दुधाने यांचे दि.१३/३/२०१८ चे पत्र.

उद्यान विभागामार्फत विविध विकास कामे करणेसाठी र.रू. १ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक,<br>बजेट कोड : सीई१७अ२४२/एसजे६-९२.<br>कामाचे नाव : नवीन हॉस्पिटलची उभारणी करणे व सावित्रीबाई फुले नर्सिंग कॉलेज | १ कोटी | --- |
| नविन सुचविलेले काम<br>उद्यान विभागामार्फत विविध विकास कामे करणे | --- | १ कोटी |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.१५/३/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र.२७**

मा.दिलिप बराटे व मा.सौ.लक्ष्मी दुधाने यांचे दि.१३/३/२०१८ चे पत्र.

विद्युत विभागामार्फत विविध विकास कामे करणेसाठी र.रू. ५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक,<br>बजेट कोड : सीई१७अ२४२/एसजे६-९२.<br>कामाचे नाव : नवीन हॉस्पिटलची उभारणी करणे व सावित्रीबाई फुले नर्सिंग कॉलेज | ५० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>विद्युत विभागामार्फत विविध विकास कामे करणे | --- | ५० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.१५/३/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २८**

श्री.शंकर भिमराव अडागळे, सेवानिवृत्त मुकादम यांचा निलंबन कालावधी सेवाकाळ समजून सदर कालावधीतील सर्व आर्थिक लाभ देण्याबाबत स्थायी समिती, पुणे महानगरपालिका यांनी पारित केलेला ठराव नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी निलंबित केला असून त्यावर मा.स्थायी समितीस अभिवेदन सादर करावयाचे असल्यास ते करणेबाबत महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक पीएमसी-३०१५/प्र.क्र.६१६/नवि-२२ मंत्रालय, मुंबई ४०००३२ दि. २ फेब्रुवारी २०१८ चा शासन निर्णय विचारासाठी

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२७/३/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २९**

पुर्व पीएमटीने बस खरेदीसाठी ओव्हर ड्राफ्टचे माध्यमातुन घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीसाठी पुणे महानगरपालिकेकडून PMPML ला सन २०१७-१८ व २०१८-१९ या वर्षात देय असलेल्या रकमेतून बँक कर्जाची व्याजासहीत थकीत असणारी रक्कम (मुद्दल+व्याज) समायोजित करुन वसूल करणेस, सदरच्या रकमा संबंधित बँकेस आदा करुन पुणे मनपाच्या मुदतठेवी मोकळया करुन घेणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मुले/१२४३ दि.२०/३/२०१८ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२७/३/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ३०**

सन २०१७-२०१८ चे अंदाजपत्रकामधील पाषाण, पंचवटी ते कोथरुडला जोडणाऱ्या बोगद्याच्या कामाचा प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी या कामाचे प्री व पोस्ट टेंडर ॲक्टीव्हीटीसाठी प्रकल्प व्यवस्थापन तज्ञ सल्लागार म्हणून मे.सी.व्ही.कांड कन्सल्टंट प्रा.लि. यांची नेमणूक करणेस व त्यांचेशी करारनामा करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.मआ/मुअ(प्र)/१२५६ दि.२०/३/२०१८ चे पत्र.

१) बोगद्याच्या कामासाठी प्री टेंडर ॲक्टीव्हीटीसाठी पूर्वगणनपत्रक रक्कमेच्या १% व पोस्ट टेंडर ॲक्टीव्हीटीकरीता प्रकल्प खर्चाच्या १.५% यानुसार प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना कन्सल्टंसी फी अदा करणेस

२) सदर कामासाठी मे.सी.व्ही.कांड कन्सल्टंट प्रा.लि. यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणेस

३) बोगद्याच्या कामासाठी करावयाच्या भुगर्भिय चाचण्यांकरीता तज्ञ सल्लागार यांना दरसुचीनुसार दर अदा करणेस

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२७/३/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**संकिर्ण**

**विषय क्र. ३१**

शहरी गरीब वैद्यकीय सहाय योने अंतर्गत पॅनेलवरील प्रायव्हेट हॉस्पिटलीमधील अंर्तरुग्ण विभागातील वैद्यकीय उपचारांसाठी ,सी.जी.एस.मान्य दराने,५०% हमी पत्रांतर्गत रक्कम रुपये एक लाख या कमाल मर्यादिऐवजी १००% वाढीने रक्कम रुपये दोन लाख या कमाज मर्यादिपर्यंत आर्थिक लाभ मिळणेसाठी चालू आर्थिक वर्षातील शहरी गरीब वैदयकीय सहाय योजनेसाठी मान्य तरतूद रक्कम रूपये २५,००,००,०००/- (अक्षरी-रक्कम रुपये पंचवीस कोटी फक्त) असून (१) सदयस्थितीत योजने अंतर्गत सभासदत्व घेण्यासाठी प्रतिवर्षी वाढत जाणारी लाभार्थींची संख्या (२) एका आर्थिक वर्षात कुटूंबातील एका सदस्यास अथवा एका पेक्षा जास्त सदस्यांस मिळून रक्कम रुपये १,००,०००/- पेक्षा जास्त होणारा वैदयकीय उपचार औषधोपचारांचा खर्च (३) रुग्णांचे गंभीर आजारांवरील प्रदीर्घ कालावधी साठी चालू असलेल खर्चीक वैदयकीय उपचार व महागडया औषधोपचारांची रक्कम हॉस्पिटल प्रशासनास अदा करणेसाठी आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांतील रुग्णांची असमर्थता या सर्व कारणांस्तव पुढील आर्थिक वर्षापासून सदर योजनेच्या तरतूदीमध्ये प्रमाणबध्द अथवा दुपटीने वाढ केल्यासच योजनेच्या प्रत्येक सभासद कुटूंबांना, एका आर्थिक वर्षासाठी, पॅनेलवरील प्रायव्हेट हॉस्पिटल्स मधील अंर्तरुग्ण विभागातील वैदयकीय उपचारांसाठी सी.जी.एच.एस.मान्य दराने ५०% हमी पत्रांतर्गत रक्कम रुपये १,००,०००/-(अक्षरी-रक्कम रुपये एक लाख) या कमाल मर्यादि ऐवजी रक्कम रुपये २,००,०००/-(अक्षरी-रक्कम रुपये दोन लाख) या कमाल मर्यादिपर्यंत आर्थिक लाभ देण्याबाबत मा. योगेश समेळ व मा.संदिप जऱ्हाड यांचे दि.२१.११.२०१७ चे पत्रावर झालेला महिला व बाल कल्याण समिती ठ.क्र.१५२,दि. २२.११.२०१७ ला अनुसरुन मा.प्र.महापालिका आयुक्त यांनी जा.क्र. मआ/ आरोग्य/ ११४७, दि.७.३.२०१८ ने पाठविलेला अभिप्रायास अनुसरुन झालेला महिला व बाल कल्याण समिती ठ.क्र.२१४, दि. १७/३/२०१८ चा विचारासाठी.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**